बीड । महाराष्ट्र रविवार दि. ०५ एप्रिल २०२६ । वर्ष ५ वे । अंक १७ पान १ । पाने ४ । किंमत ३ रूपये

दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र




संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ९:४५

RNI/MAHMAR/2021/80074 Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 https://marathwadapatra.com https://epaper.marathwadapatra.com










# कुठलं जहाज अन् कुठे वळवलं ?

# दिल्लीच्या उत्तराने सर्वांची बोलती बंद

## भारत 'अनस्टॉपेबल', ४५ हजार टन LPG मंगळुरु बंदरात

**नवी दिल्ली/तेहरान**

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थिती आणि युद्धजन्य हालचालींमुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेल व गॅस पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. महत्त्वाच्या समुद्री मार्गांवरील असुरक्षितता, जहाजांच्या हालचालींवर वाढलेले धोके आणि पुरवठ्यातील अनिश्चितता यामुळे अनेक देश सावध झाले आहेत.

अशा परिस्थितीत भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेबाबतही चर्चा सुरू असून कच्च्या तेलाच्या पुरवठ्याविषयी विविध दावे आणि अफवा समोर येत आहेत.



इराणमधून येणाऱ्या कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) एका जहाजाने भारतातील वडीनार (Vadinar) बंदराऐवजी चीनकडे वळवले अशा प्रकारच्या बातम्या आणि सोशल मीडियावर फिरणाऱ्या पोस्ट्स वस्तुनिष्ठदृष्ट्या चुकीच्या आहेत. भारत 40 पेक्षा अधिक देशांकडून कच्चे तेल आयात करतो आणि भारतीय तेल कंपन्यांना व्यावसायिक गरजेनुसार विविध देशांमधून व विविध भौगोलिक क्षेत्रांतून तेल खरेदी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे.

मध्यपूर्वेतील पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवरही भारतीय रिफायनरी कंपन्यांनी त्यांच्या कच्च्या तेलाच्या गरजा सुरक्षित केल्या आहेत. यामध्ये इराणकडून होणाऱ्या पुरवठ्याचाही समावेश आहे. काही ठिकाणी पसरवण्यात येणाऱ्या अफवांप्रमाणे इराणकडून तेल आयातीसाठी कोणतीही पेमेंटसंबंधी अडचण निर्माण झालेली नाही.

जहाज वळवण्याच्या (वेसल डायव्हर्जन) दाव्यांकडे पाहताना तेल व्यापाराची कार्यपद्धती लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. 'बिल ऑफ लॅडिंग' (Bills of Lading) मध्ये नमूद केलेले गंतव्य बंदर हे अनेकदा केवळ सूचक (indicative) असते. समुद्रात असताना व्यापारातील ऑप्टिमायझेशन आणि ऑपरेशनल लवचिकतेनुसार जहाजाचे अंतिम गंतव्य बदलले जाऊ शकते. त्यामुळे अशा बदलांना चुकीच्या अर्थाने घेणे योग्य नाही.

पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात येते की, येत्या काही महिन्यांसाठी भारताच्या कच्च्या तेलाच्या गरजा पूर्णपणे सुरक्षित आहेत.

एलपीजी (LPG) संदर्भातही काही दावे चुकीचे ठरत आहेत. 'सी बर्ड' (Sea Bird) नावाचे एलपीजी जहाज ज्यामध्ये सुमारे 44 हजार मेट्रिक टन (TMT) इराणी एलपीजी आहे ते 2 एप्रिल रोजी भारतातील मंगळुरू (Mangalore) बंदरावर दाखल झाले असून सध्या तेथे एलपीजी उतरवण्याची (discharging) प्रक्रिया सुरू आहे.

## केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादीच्या नव्या ठरावांना मान्यता

# राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार, पार्थही खासदार



### कायदेशीर तज्ञांचे मत

**निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी कॉंग्रेसने पाठवलेल्या ठरावांची सखोल छाननी करून त्यांना मान्यता दिली आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्षपदी निवड आणि पार्थ पवार यांची खासदारकी यात कोणतीही कायदेशीर कमतरता नाही. या निर्णयांना सहजासहजी आव्हान दिले जाऊ शकत नाही, कारण आयोगाकडे सादर केलेल्या पत्रात खर्पींहळींशिसरीव या शब्दांचा वापर करून स्पष्टता देण्यात आली आहे. भविष्यात कोणताही बदल करायचा असल्यास, तो पुन्हा राष्ट्रीय अधिवेशनातच करावा लागेल आणि त्यानंतरच आयोगाला कळवावा लागेल.**

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अंतर्गत रचनेत गेल्या दोन महिन्यांत मोठे फेरबदल झाले असून, आता पक्षाची धुरा अधिकृतपणे सुनेत्रा पवार यांच्या हाती आली आहे. १६ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ दरम्यान घडलेल्या वेगवान घडामोडींनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्षाच्या नव्या ठरावांना आणि कार्यकारिणीला मान्यता दिली आहे. यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून आणि पार्थ पवार यांची खासदारकी कायदेशीररित्या भक्कम झाली आहे. पक्षातील बदलांची सुरुवात १६ फेब्रुवारी २०२६ रोजी झाली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दिवशी निवडणूक आयोगाला एक नवी पक्षाघटना सादर करण्यात आली होती. यामध्ये कार्याध्यक्ष (प्रफुल्ल पटेल) यांना राष्ट्रीय अध्यक्षांच्या समकक्ष अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, निवडणूक आयोगाने ही नवी घटना स्वीकारली नाही किंवा तिला मान्यताही दिली नाही. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील वरळी येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात अत्यंत महत्त्वाचे दोन निर्णय घेण्यात आले.

१. सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

२. पक्षाच्या मूळ घटनेत बदल करून कार्यकारिणीची मुदत तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढवण्यात आली.

### पत्रांची छाननी आणि तांत्रिक पेच

१ मार्च २०२६ रोजी प्रफुल्ल पटेल यांचे विश्वासू ब्रिजमोहन यांनी ईमेलद्वारे आयोगाला माहिती देण्याचा प्रयत्न केला. यात सुनेत्रा पवार अध्यक्ष आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष असल्याचा उल्लेख होता. मात्र, या पत्रासोबत अधिवेशनातील अधिकृत ठराव किंवा आमदार-खासदारांच्या सह्या नसल्याने आयोगाने त्याकडे दुर्लक्ष केले. विशेष म्हणजे, २६ फेब्रुवारीच्या नव्या कार्यकारिणीत ब्रिजमोहन यांचा समावेश नव्हता.

शेवटी १० मार्च २०२६ रोजी वरळी अधिवेशनातील अधिकृत ठराव आयोगाकडे पाठवण्यात आले. यामध्ये सुनेत्रा ▶▶ उर्वरित पान २ वर

## ईट येथे गुगळादेवी यात्रा निमित्त शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची भव्य दिव्य मिरवणूक

### पारंपरिक वाद्य, हरी नाम घोषाने गावकरी मंत्रमुग्ध



**बीड । प्रतिनिधी**

दर वर्षी प्रमाणे गुगळादेवी मातेची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होत असते गेली १० ते ११ वर्षापासून गुगळादेवी यात्रा निमित्त व भिक्षा कार्यक्रम निम्मित गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांची ईट ग्रामस्थांच्या वतीने भव्य दिव्य स्वागत मिरवणूक काढण्यात येते या हि वर्षी उत्साहात गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल ताशा लेझीम वाजवत गावातील तरुण मंडळी, महिला मंडळी, लहान थोर भाविक भक्तांच्या उपस्थिती मध्ये ईट फाटा ते ईट गाव या मार्गामध्ये सडा रांगोळी काढून हरी नामाच्या जय घोषात करत गावकऱ्यांच्या वतीने गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. गुगळादेवी यात्रा निमित्त ईट गावातील हनुमान मंदिरात परिसरात मिरवणुकीचा समारोप करण्यात या ठिकाणी सर्व ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते

## वादळी वाऱ्याने घरांची पडझड; पिके भुईसपाट, फळबागांचे नुकसान पोखरी, ताडसोना, वलीपुर जवळा, मन्यारवाडी परिसराला अवकाळीचा तडाखा

# तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्या : गंगाधर घुमरे



**घाटसावळी । प्रतिनिधी**

नाळवंडी जिल्हा परिषद गटात असणाऱ्या पोखरी वलीपुर तांडा, जवळा,मैंदा, मन्यारवाडी सह परिसराला अवकाळीचा तडाखा बसला असून अनेकांच्या घरांची पडझड झाली घरावर झाडे कोसळली, पत्रे उडाली फळबागांचे



नुकसान झाले इतर पिके भुईसपाट झाली उन्हाळ्यात ताडसोना येथील व जवळा वलीपुर नद्यांना पूर आला अशी भयानक परिस्थिती कधी नव्हे ती उदभवली त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून तात्काळ याचे पंचनामे करून नुकसान भरपाई शासनाने देण्याची मागणी जिप चे माजी उपाध्यक्ष गंगाधर घुमरे यांनी बीड प्रहार शी बोलताना केली आहे .जिल्ह्यातकाळी ने कहर केला असून गारा,वादळी वारे,पाऊस यामुळे सर्व जनतेला याचा फटका बसला आहे, लाइटचे पोल खाली पडले, पिकांची नुकसान झाली फळबागांचे अतोनात नुकसान झाले, घराघरूचेउडाले भिंती पडल्या, घरावर झाडे पडली असे नुकसान झाले असून हे भरून निघणारे नुकसान नाही तात्काळ याचे पंचनामे करून नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे .

# निसर्ग कोपलाय ! ताशी ८०किमी वेगानं येतंय वादळ

## महाराष्ट्राला बसणार तडाखा; देशभरात संकटाची चाहूल

**मुंबई । प्रतिनिधी**

मार्च महिन्याचंच वातावरण एप्रिल महिन्यातसुद्धा कायम राहिलं असून, महाराष्ट्रासह देशभरात हवामान बदलांमुळं नागरिक त्रस्त झाले आहेत. तर यंत्रणांच्या चिंतेत भर पडली आहे. ज्या एप्रिल महिन्यात उकाडा देशभरात थैमान घालण्यास सुरुवात करतो त्याच एप्रिल महिन्यात यंदाच्या वर्षी पावसानं हजेरी लावली आहे. उत्तर भारतात वादळी पाऊस, गारपीट आणि हिमवृष्टी होत आहे. तर, महाराष्ट्रालाही तूफान गारपिटीचा तडाखा बसला आहे. त्यातच आता केंद्रीय हवामानशास्त्र विभागानं धडकी भरवणारा इशारा दिला आहे.




IMD च्या इशाऱ्यानुसार देशातील अनेक राज्यांमध्ये वाऱ्याचा वेग ताशी ८०किमी इतकी मर्यादा गाठणार असून, या वावटळामध्ये बरंच नुकसान होण्याची शक्यता आहे. ज्यामुळं शेतात उभी असणारी पिकं धोक्यात असून, शहरांमधील वाहतुकीपासून ते अगदी जनजीवन विस्कळीत होण्यापर्यंतचे परिणाम दिसतील अशीही भीती व्यक्त करण्यात येत आहे. ४ ते ७ एप्रिल या दरम्यान हवामानाचं हे रौद्र रुप पाहायला मिळेल असं हवामान विभागानं स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्रातही देशातील या हवामान प्रणालीचा परिणाम होणार आहे. पुढील २४ तासांमध्ये मध्य महाराष्ट्र, सांगली, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर, उर्वरित राज्यात पावसाच्या हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य प्रदेशपासून ▶ उर्वरित पान २ वर

# कार विहिरीत कोसळून 9 जणांचा मृत्यू

## रस्त्याच्या मधोमध असलेली विहीर बुजवण्यास सुरुवात, मालकावर गुन्हा दाखल



**दिंडोरी । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं शुक्रवारी रात्री उशिरा भरधाव कार विहिरीत कोसळून एकाच कुटुंबातील ९ जणांच मृत्यू झाला. इंदोरे गावचं कुटुंब त्यांच्या घरातील मुलांच्या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमासाठी दिंडोरीत आलं होतं. ते परतताना रात्री १० वाजण्याच्या सुमारास शहरातील शिवाजीनगर परिसरात असलेल्या विहिरीत कार कोसळली. अपघातात ९ जणांचा मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाला जाग आली असून रस्त्याच्या मधोमध असलेली विहिरी बुजवण्यात येत आहे. दरम्यान, गेल्या कित्येक वर्षांपासून ही विहीर वापरात असून प्रशासनाकडून रस्त्याचं बांधकाम केलं तेव्हा याकडे कसं दुर्लक्ष झालं असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दिंडोरीतील अपघातग्रस्त विहीर बुजविण्याचे काम सुरू आहे. तर विहिरीचे मालक राजेंद्र राजे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर विहिरीचे मालक राजेंद्र राजे बेपत्ता झाले आहेत. विहिरीच्या मालकावर गुन्हा दाखल झाल्यानंतर विहीर बुजवण्याचं काम सुरू केलं जात आहे. दिंडोरीत शिवाजीनगरमध्ये असणारी विहीर ही जुनी असली तरी नव्याने बांधण्यात आलेला रस्ता ▶▶ उर्वरित पान २ वर

◆ संपादकीय...

# नामर्द आणि नपुंसक विचाराने महापुरुषांची उंची कमी होत नाही



हा महाराष्ट्र आहे. संत महंताची भूमी. छत्रपती शिवाजी राजेंचे स्वराज्य. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी क्रांती घडवलेली भूमी. अनेक थोर संत, महापुरुष, समाज सुधारक, विचारवंत, तंत्रज्ञ शास्त्रज्ञ या मातीने दिले. छातीला माती लावून लढणारे सैनिक या मातीने दिले. कला असो क्रीडा असो किंवा कोणतेही क्षेत्र असो या महाराष्ट्राच्या मावळ्यांनी आपली विजयी पताका फडकविली आहे. आज मला एक प्रश्न पडतो आहे की कोणाची नजर लागली आहे या महाराष्ट्राला. आज महापुरुषांना वाटून घेतले जात आहे. महापुरुषांच्या नावे त्यांची विचारधारा संकुचित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जाती धर्माच्या नावाने तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राजकीय स्वार्थापोटी हा वाद इतका शीगेला पोहोचला आहे की सौख्य आणि प्रेमाची जागा द्वेष आणि मत्सर यांनी घेतली आहे. टीका टिपणी करणे आणि इतर जाती–धर्माचे नैतिक अधपतन करणे यासाठी सोशल मीडियाचा प्रचंड प्रमाणामध्ये वापर होत आहे. मुक्त अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणामध्ये स्वैराचार निर्माण झाला आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये सजातीय अभिमान आणि इतर जाती बद्दल द्वेष घृणा तिरस्कार निर्माण होत आहे. नकारात्मकतेने मन अगदी काठोकाठ भरून गेलेले आहे. या सर्व बाबीला जबाबदार काही मंडळी आहेत त्यांना हे सौख्य, एकता, टिकू द्यायची नाही.कारण त्यांना राजकीय पोळी भाजायची आहे.हिंदू मुस्लिम, हिंदू बौद्ध मराठा ओबीसी , मराठा वंजारी, असे वाद निर्माण केले, महापुरुषांना वाटून त्यांची विचारधारा संकुचित केली की बस गट तट पडतात आणि इच्छित परिणाम त्यांना मिळतात ही त्यांची दृढता झाली आहे. या या बाबींना महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील जनता भीक घालणार नाही याची काळजी तुम्ही आम्ही घेतली पाहिजे. थोर महापुरुष विचारवंत संत महंत हे कोणत्याही जाती धर्माचे नसतात त्यांनी दिलेली शिकवण ही सर्व समाजासाठी असते सकल जनतेसाठी असते त्यांची विचारधारा ही इतकी संकुचित नाही की ती जातीपूरती मर्यादित राहील. टीका टिपणी करताना आपण आपल्या मर्यादा पाळल्या पाहिजेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली इतर धर्मियांच्या इतर जातीय समाजाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची आपण पुरेपूर दक्षता घेतली पाहिजे. महापुरुषांच्या विचारांची उंची कधीच कमी होत नसते. संत विचारधारा कधीच बुडत नसते. मूठभर समाजकंठक आणि त्यांचे संकुचीत विचार आणि त्यांना समर्थन करणारे बांडगुळे यांना या सुसंस्कृत महाराष्ट्राच्या जनतेने मातीत गाडले पाहिजे. खरच आजपासून आपण आणि आपल्या परिवारास एकसंघ, एकविचारी महाराष्ट्र घडविण्यास बांधील करू. जाती धर्माच्या चौकटीतून बाहेर येऊन सामाजिक समता, न्याय, एकता अंगिकारू. थोर महापुरुष आणि त्यांचे विचार या मातीत आहेत हे दाखवून देऊ. चला महाराष्ट्र घडवू.

# गुणवत्तेच्या नावाखाली संधींचे केंद्रीकरण आणि वाढती शैक्षणिक विषमता

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्यायाची परंपरा आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार करता, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेला शासन आदेश हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून, तो राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक संरचनेवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या शासन आदेशामध्ये शिक्षक किंवा प्राध्यापक भरती किंवा शैक्षणिक पात्रतेचे मूल्यांकन करताना उमेदवाराने शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठऋ) क्रमांकाचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत टड, ढकए आणि –ठथण (डहरपसहरळ) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पहिल्या गटामध्ये ठेवण्याचा किंवा प्राधान्य देण्याचा निकष लागू करण्यात आलेला आहे. वरकरणी पाहता हा निर्णय गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने घेतलेला वाटतो ; मात्र वास्तवात तो सामाजिक विषमता वाढविणारा आणि वंचित घटकांना दुय्यम स्थान देणारा असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील शैक्षणिक वास्तवाचा विचार केला असता, छखठऋ१०० च्या आत सातत्याने स्थान मिळवणारी सार्वजनिक विद्यापीठे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ ही प्रामुख्याने पुढे येतात. याचा सरळ अर्थ असा होतो की राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्याख्या केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांपुरती मर्यादित केली जाते. परंतु हा दृष्टिकोन वास्तवापासून पूर्णतः दूर आहे. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी, दलित आणि बहुजन समाजातून येतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित असते. अशा विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ सारख्या विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे केवळ प्रवेश मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संघर्षांचे एक मोठे आव्हान असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता, त्यांना दरमहा होणारा खर्च परवडणेही कठीण असते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये राहण्यासाठी लागणारे भाडे, अन्न, प्रवास, शिक्षण शुल्क, पुस्तके आणि इतर आवश्यक खर्च यांचा एकत्रित विचार करता, हा खर्च हजारो रुपयांपर्यंत पोहोचतो. अशा परिस्थितीत गरीब, आदिवासी किंवा बहुजन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे जवळजवळ अशक्य ठरते. त्यामुळे शासन आदेशामध्ये नमूद केलेला निकष प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलतो. या शासन आदेशाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातील निकष. टड, ढकए आणि –ठथण (डहरपसहरळ) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ही गोष्ट केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठीच शक्य आहे. परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च हा लाखो रुपयांमध्ये असतो. यामध्ये केवळ शिक्षण शुल्कच नव्हे, तर राहणीमानाचा खर्च, प्रवास, व्हिसा, विमा आणि इतर अनेक खर्चांचा समावेश असतो. त्यामुळे गरीब किंवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी हा पर्याय व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत शासनाने हा निकष लावणे म्हणजे सामाजिक विषमता अधिकच वाढविण्याचा मार्ग मोकळा करणे होय. याचबरोबर, या शासन आदेशातील सर्वात मोठी विसंगती म्हणजे त्याचा कालबाह्य वापर. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठऋ) ही प्रणाली भारतात २०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात या क्रमवारीचा कोणताही संबंध नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लागू करणे म्हणजे त्यांच्या संधींवर अन्याय करणे होय. हा प्रकार न्याय आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारा आहे. कोणताही नियम तो लागू होण्यापूर्वीच्या कालावधीवर लावणे हे प्रशासनिक दृष्ट्या चुकीचे मानले जाते, आणि येथेही तीच चूक स्पष्टपणे दिसून येते. या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन होण्याची प्रक्रिया सुरू होते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक विद्यापीठे ही लाखो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची प्रमुख साधने आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येतात आणि अनेकदा उत्कृष्ट यश संपादन करतात. मात्र त्यांच्या विद्यापीठाचा छखठऋक्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी गुण दिले जातात. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही आणि त्यांच्या संधी मर्यादित होतात. यामुळे एक गंभीर सामाजिक परिणाम निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढविण्याची प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो. याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये वर्गभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. एकीकडे उच्च क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सधन वर्ग, तर दुसरीकडे स्थानिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सर्वसामान्य वर्ग अशी विभागणी निर्माण होते. ही विभागणी केवळ शैक्षणिक नसून सामाजिक आणि मानसिक स्वरूपाचीही आहे. यामुळे समाजात दरी वाढते आणि समतेचा पाया कमकुवत होतो. या सर्व पार्श्वभूमीवर, हा शासन आदेश केवळ एक शैक्षणिक धोरण नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आव्हान देणारा निर्णय ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु सध्याचा निर्णय हा समतेपेक्षा असमतोल वाढविणारा ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

शिक्षण, समानता आणि संविधानिक मूल्यांवरील परिणाम : दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशाच्या परिणामांचा विचार केवळ विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही ; कारण या निर्णयाचा सर्वात थेट आणि दीर्घकालीन परिणाम शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेवर, शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि समाजातील समतेच्या संकल्पनेवर होणार आहे. या आदेशानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठऋ) क्रमांकाचा आधार घेतला जात असल्यामुळे, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेतच असमानतेची बीजे पेरली जात आहेत. शिक्षक किंवा प्राध्यापक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून तो समाज घडविण्याचा केंद्रबिंदू असतो. विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेले शिक्षक किंवा प्राध्यापक विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन देतात. परंतु जर शिक्षक भरती प्रक्रियेमध्येच काही विशिष्ट विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिले गेले, तर या प्रक्रियेतून येणारी विविधता कमी होईल. परिणामी, शिक्षण क्षेत्रात एकसुरीपणा निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना विविध सामाजिक वास्तवांचा अनुभव घेण्याची संधी कमी मिळेल.

या शासन आदेशामुळे ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील उमेदवारांना शिक्षक किंवा प्राध्यापक होण्याची संधी कमी मिळण्याची शक्यता आहे. कारण बहुसंख्य असे उमेदवार हे राज्यातील स्थानिक विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले असतात. त्यांच्या विद्यापीठांचा छखठऋक्रमांक कमी असल्यामुळे त्यांना गुणांकनात कमी स्थान दिले जाईल. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य विचार न होता केवळ संस्थेच्या क्रमांकावरून त्यांचे मूल्यमापन केले जाईल. हा प्रकार केवळ अन्यायकारकच नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाही विरोध करणारा आहे.या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांच्या प्रतिमेवरही विपरीत परिणाम होतो. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील विद्यापीठे ही केवळ शिक्षण संस्था नसून त्या त्या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अनेक अडचणींवर मात करून पुढे येतात.

पर्याय, उपाय आणि समतोल शिक्षणव्यवस्थेची गरज : दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता, केवळ टीका करून थांबणे पुरेसे नाही ; तर त्यासाठी योग्य पर्याय आणि रचनात्मक उपाय सुचवणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्र हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून ते सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे या क्षेत्रात घेतलेले कोणतेही धोरणात्मक निर्णय हे सर्वसमावेशक, न्याय्य आणि वास्तववादी असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या शासन आदेशामध्ये गुणवत्ता या संकल्पनेचा जो अरुंद अर्थ लावण्यात आला आहे, तो बदलणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वप्रथम, उमेदवारांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठऋ) क्रमांकावर आधारित निकष लावण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर आधारित मूल्यांकन प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान, संशोधन क्षमता आणि सामाजिक बांधिलकी या घटकांचा विचार करून त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे. केवळ संस्थेच्या क्रमांकावर आधारित मूल्यांकन केल्यास अनेक गुणवत्तावान उमेदवार संधीपासून वंचित राहतात. दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांना समान संधी उपलब्ध करून देणे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठ हे त्या त्या भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक निधी, संशोधन सुविधा, पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक किंवा प्राध्यापक उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. जर सर्व विद्यापीठांची गुणवत्ता सुधारली, तर विद्यार्थ्यांना केवळ काही मोजक्या विद्यापीठांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

तिसरे म्हणजे, ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आणि सवलती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध करून दिली गेली, तर काही प्रमाणात विषमता कमी होऊ शकते. परंतु दीर्घकालीन उपाय म्हणून शिक्षणाचे विकेंद्रीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातही शासनाने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. टड, ढकए आणि –ठथण सारख्या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे हे सर्वांसाठी शक्य नाही. त्यामुळे या निकषाचा वापर केवळ अतिरिक्त गुणवत्तेचा घटक म्हणून करावा, तो अनिवार्य निकष म्हणून लावू नये. अन्यथा हा निकष केवळ सधन वर्गासाठीच फायदेशीर ठरेल. २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांसाठी स्वतंत्र धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठऋ) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे अन्यायकारक आहे. अशा उमेदवारांसाठी त्यांच्या अनुभव, कार्यक्षमता आणि इतर गुणांवर आधारित मूल्यांकन प्रणाली तयार केली पाहिजे. याचबरोबर, शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता या संकल्पनेचा व्यापक अर्थ स्वीकारणे गरजेचे आहे. गुणवत्ता म्हणजे केवळ उच्च क्रमांकाच्या संस्थेत शिक्षण घेणे नव्हे, तर त्या शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम महत्त्वाचा असतो. अनेकदा ग्रामीण भागातील विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजात अधिक प्रभावी कामगिरी करतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान करणे आवश्यक आहे. शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करताना सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील कोणतेही धोरण हे केवळ काही मोजक्या लोकांसाठी नव्हे, तर सर्व घटकांसाठी फायदेशीर असावे. अन्यथा अशा धोरणांमुळे समाजात असंतोष निर्माण होण्याची शक्यता असते. या संदर्भात, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि न्याय्यता सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवारांची निवड करताना त्यांच्या वास्तविक गुणवत्तेचा विचार केला गेला पाहिजे. तसेच, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील उमेदवारांना समान संधी मिळेल याची खात्री करणे गरजेचे आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रात विविधता टिकून राहील आणि विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन मिळेल.

शेवटी, शिक्षण हे समाजातील विषमता कमी करण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. परंतु जर शिक्षण व्यवस्थेमध्येच विषमता निर्माण केली गेली, तर समाजातील दरी अधिक वाढेल. त्यामुळे आज गरज आहे ती समतोल, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण धोरणाची. शासनाने घेतलेले निर्णय हे दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊनच घ्यावेत.

११ फेब्रुवारी २०२६ चा शासन आदेश हा गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने घेतलेला असला, तरी त्याचे परिणाम विचारात घेतले असता तो सामाजिक विषमता वाढविणारा ठरतो. त्यामुळे या निर्णयाचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा गुणवत्ता या नावाखाली आपण नकळतपणे समाजात असमानता वाढवत आहोत, आणि हे कोणत्याही प्रगत समाजासाठी योग्य नाही.

– डॉ. राजेंद्र बगाटे,

◆ पान १/४ वरून पुढे...

## केंद्रीय निवडणूक आयोगाकडून....

पवार – राष्ट्रीय अध्यक्ष, शिवाजीराव गर्जे – खजिनदार, कार्यकारिणीत पटेल, तटकरे, भुजबळ यांच्यासह १४ जणांचा समावेश करण्यात आला. (परंतु त्यांच्या विशिष्ट पदांचा उल्लेख करण्यात आलेला नाही)

निवडणूक आयोगाची मान्यता आणि कायदेशीर स्थान–११ मार्च २०२६ रोजी पाच राज्यांच्या निवडणुकीत 'घड्याळ' चिन्ह आरक्षित करण्याबाबत पुन्हा पत्रव्यवहार झाला. आयोगाच्या अभिलेखावर अधिकृत प्रतिनिधी म्हणून शिवाजीराव गर्जे यांचे नाव असल्याने, आयोगाने त्यांच्याशी संपर्क साधून अधिकृत पत्रव्यवहार पूर्ण केला.

## निसर्ग कोपलाय ! ....

विदर्भ आणि मराठवाड्यापासून तामिळनाडूपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्यामुळं राज्यात पावसासाठी पूरक वातावरण आहे. पावसाचा तडाखा बसणाऱ्या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्यानं जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, धाराशिव, हिंगोली, अकोला, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोलीचा समावेश आहे.

पश्चिम महाराष्ट्रात सांगली, सातारा, पुण्यातील काही भागांमध्ये पावसाचा इशारा आहे. तर, कोकणातील घाट क्षेत्रावर तुरळक पावसाची शक्यता आणि ढगाळ वातावरणाचा अंदाज आहे. मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर इथं दमट हवामान उष्णता आणखी तीव्र करताना दिसेल. तर, सूर्यास्तानंतर मात्र सोसाट्याचे वारे या भागांमध्येही वाहणार असल्याची शक्यता आहे.

पर्यटनासाठी निघताय ? पाहा कोणत्या राज्यात काय स्थिती...

आयएमडीनं देशभरात पाऊस आणि गारपिटीसह वादळी वाऱ्यांचा इशारा दिला आहे. मुख्य म्हणजे सध्याच्या सुट्ट्यांच्या दिवसांमध्ये बरीच मंडळी पर्यटनासाठी घराबाहेर पडत आहेत, त्यांनीही या हवामान बदलांचा अंदाज घ्यावा. जिथं अरुणाचल प्रदेश, मध्य महाराष्ट्र, तामिळनाडूच्या काही भागांमध्ये पावसाची शक्यता असून इथंही वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ८० किमीवर पोहोचेल. देशात दोन पश्चिमी झंझावात अतिशय तीव्रतेनं सक्रिय होणार असल्यामुळं उत्तर पश्चिम भारतात सोसाट्याचा वारा आणि पावसाची हजेरी पाहायला मिळेल.

## कार विहिरीत....

थेट विहिरीपासून एक फुटावर संपला आहे. तिथून डाव्या बाजूला कच्ची वाट आहे. जी रात्रीच्या अंधारात दिसत नाही. भरधाव वेगात रस्त्याचा अंदाज न आल्यानं कार थेट विहिरीत कोसळली. एका खाजगी क्लासचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि गुणगौरव समारंभ आटोपून घरी परतत असताना, विद्यार्थ्यांसह पालकांची कार विहिरीत कोसळून ९ जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये ७ विद्यार्थी आणि ३ पालकांचा समावेश आहे. दिंडोरी तालुक्यातील इंदोरे येथील रहिवासी असलेले दरगोडे कुटुंब आणि काही विद्यार्थी दिंडोरी शहरात एका खाजगी शिकवणीच्या कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रम उत्साहात पार पडल्यानंतर रात्री १० वाजेच्या सुमारास हे सर्वजण कारने (क्र. MH15-JS-1053) गावाकडे परतत होते. यावेळी शिवाजी नगर भागातील राजू राजे यांच्या मालकीच्या पाण्याने भरलेल्या उघड्या विहिरीत ही कार थेट कोसळली.

## भाजप कार्यकर्त्यांनी...

तालुकाध्यक्ष चंद्रकांत फड आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले, स्व.गोपीनाथ मुंडे यांनी ग्रामीण भागात सामान्य स्तरावर काम करत पक्षाचा विस्तार केला. कार्यकर्त्यांनी तोंडात साखर, डोक्यात बर्फ आणि पायात चक्र ठेवून सातत्याने लोकांमध्ये राहिले पाहिजे. अंत्योदयाच्या भावनेतून सामान्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा कार्यकर्ता घडला पाहिजे. यावेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर, बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, शिवाजी मुंडे, प्रा.देवीदास नागरगोजे, अजय सवई, नवनाथ शिराळे, डॉ.रवींद्र घुंबरे, मिरा गांधले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात योगा शिबिराने झाली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक लोढा यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिंबागणेश पाणीपुरवठा...

झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, आज (दि.०४) नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे व लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी भायाळा साठवण तलाव परिसरातील चोरीच्या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, विनायक वाणी, शिवाजी वाणी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी सुखदेव वाणी उपस्थित होते. डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, भायाळा साठवण तलावातून लिंबागणेश व पोखरी गावांना पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत सार्वजनिक विहिरीच्या मोटारींच्या वायरची वारंवार चोरी होणे हे गंभीर असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच आव्हान दिले आहे. यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# संत साहित्याच्या माध्यमातून तरुण पिढीला दिशा देणार : ह.भ.प. स्वामी योगीराज महाराज यांची पत्रकार परिषदेत माहिती

## शिदोड येथे ४७ व्या भव्य नारळी सप्ताहाचे आयोजन; संत साहित्याचा होणार जागर; शिदोडमध्ये भक्ती आणि प्रबोधनाचा संगम; व्यसनमुक्ती आणि सामाजिक उपक्रमांवर भर देणार

**बीड । प्रतिनिधी**

आजची तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे झुकत असून शालेय विद्यार्थी मोबाईलच्या विळख्यात अडकले आहेत. या पिढीचे मन आणि मत परिवर्तन करण्यासाठी संत साहित्य हाच रामबाण उपाय आहे. संत विचारांच्या माध्यमातून तरुणांना व्यसनमुक्त करून समाजाला योग्य दिशा देण्याचा आमचा संकल्प आहे,असे प्रतिपादन ह.भ.प. स्वामी योगीराज महाराज यांनी केले. शिदोड येथे आयोजित करण्यात आलेल्या ४७ व्या भव्य नारळी अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. हा भव्य आध्यात्मिक सोहळा रविवार, ५ एप्रिल २०२६ ते १२ एप्रिल २०२६ दरम्यान श्री क्षेत्र संस्थान रामगडच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.

या पत्रकार परिषदेत व्यसनमुक्ती व संस्कारांचा संदेश समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेबाबत चिंता व्यक्त करत महाराज म्हणाले की, श्रीक्षेत्र रामगड यांच्यावतीने शिदोड येथील भव्य दिव्य अशा ४७ व्या नारळी सप्ताहाच्या माध्यमातून केवळ अध्यात्म नव्हे, तर सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी शालेय स्तरावर संस्कारांची पेरणी करणे हाच,



मुख्य उद्देश आहे. त्यामुळे या नारळी सप्ताहाच्या माध्यमातून तरुण पिढी आणि विद्यार्थ्यांना मोबाईल व इतर व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी विशेष प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या नारळी सप्ताहत केवळ धार्मिक कार्यक्रमापुरता मर्यादित नसून समाजोपयोगी उपक्रमांनी समृद्ध असणार आहे. यामध्ये शेतकरी प्रबोधन करणार आहोत.

बीड जिल्ह्यासह राज्यातील कोणत्याही शेतकऱ्यांनी आत्महत्या सारखे पाऊल उचलू नये म्हणून त्यांचे खंबीर मनोबल वाढविण्यासाठी प्रबोधन केले जाणार आहे. शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी मार्गदर्शन करणार आहोत.तसेच रक्तदान शिबिर, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि प्लास्टिकमुक्ती अभियान, स्वच्छता अभियान, स्वच्छ व निरोगी परिसराचा संदेश या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत सकारात्मक विचार पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भक्तीमय वातावरणात दैनंदिन कार्यक्रम– या सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम, गाथा भजन, दुपारचे संगीत रामकथा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री कीर्तन व जागर असे भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघणार आहे.

नामवंत कीर्तनकारांची मांदियाळी– या सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकार आपली सेवा देत आहेत. विशेषतः समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर, ज्ञानेश्वर महाराज तांबे, संजय महाराज पाचपोर, जयवंत महाराज बोधले, पुरुषोत्तम महाराज पाटील यांसारख्या दिग्गजांचे कीर्तन आणि प्रवचनाचा भाविकांना लाभ होणार आहे.

तसेच, ह.भ.प. रामायणाचार्य अंकुर महाराज साखरे यांच्या रसाळ वाणीतून सादर होणारी 'संगीत रामकथा' हे सोहळ्याचा विशेष आकर्षण ठरणार आहे.

परंपरा आणि प्रेरणेचा वारसा– ब्रह्मलीन महात्मा राम बाबा यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह.भ.प. किसन बाबा आणि ह.भ.प. लक्ष्मण बाबा यांच्या प्रेरणेने हा सोहळा पार पडत आहे. ह.भ.प. गुरुवर्य महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आला आहे.

सदरील नारळी सप्ताहचा आरंभ उद्या रविवार दिनांक एप्रिल रोजी होत आहे. तर रविवार, १२ एप्रिल रोजी सकाळी 'काल्याचे कीर्तन' आणि त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

भक्तिमय 'ज्ञानयज्ञा'चा लाभ घ्यावा– आवाहन – बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील भाविकांनी, विशेषतः तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक आणि शिदोड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेच्या प्रसंगी ह.भ.प. योगीराज महाराज यांच्यासह शिदोड येथील आयोजक समितीतील सर्व पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजमध्ये स्वच्छ,पारदर्शक कारभाराच्या बळावर कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेला ७५ लाखांचा नफा

**बँकेने १०० कोटींचा ऐतिहासिक टप्पा पार करत ६१ कोटींचे केले कर्ज वाटप ; बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांची माहिती**

**केज । प्रतिनिधी**

शहरातील कृष्णा अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेने १०० कोटींचा टप्पा पार केला असून त्यापैकी बँकेने ६१ कोटींचे कर्ज वाटप केले आहे.२३ कोटी रूपये बँकने गुंतवणूक केली आहे. बँकेकडे सध्या ८ कोटींचा स्वनिधी आसून बँकेचा ग्रॉस.एन.पी.२.९८% तर निव्वळ एन पी.ए १.६४ % इतका आहे.दरम्यान बँकेला यावर्षी ७५ लाखांचा निव्वळ नफा झाला असून बँकेच्या केज, बीड, माजलगाव, नांदूरघाट, कळंब, शिरूर (का) येथे एकुण ६ शाखा कार्यरत आहेत.तसेच लवकरच बँकेच्या सर्व शाखखेतून मोबाईल बँकिंग, यूपिआय, फोन पे, गुगल पे खातेदारांच्या सेवेत सुरू होणार आहे.दरम्यान हजारो



सभासद,ठेवीदार आणी ग्राहकांनी दाखवलेल्या विश्वासाच्या बळावर बँकेने १०० कोटींचा ऐतिहासिक टप्पा सर केला आसल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी दिली आहे.

बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे यांनी केज शहरात २८ वर्षांपूर्वी कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली होती.बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांच्या कूशल मार्गदर्शनाखाली स्वच्छ व पारदर्शक कारभाराच्या बळावर बँकेने अल्पावधीतच यशस्वी भरारी घेतली असून बँकेने १०० कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे. बँकेला मागील कित्येक वर्षांपासून राज्य पातळीवर विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बँकेचे हितचिंतक, खातेदार, ठेवीदार,सभासद व ग्राहकांच्या विश्वासाच्या जोरावर बँकेला आर्थिक चालु वर्षात १०० कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६० कोटींचे कर्ज वाटप केले आहे. या माध्यमातून बँकेच्या कर्जदारांना विविध व्यावसाय उभारून स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली आहे. तर बँकेला चालु आर्थिक वर्षात ७५ लाखांचा निव्वळ नफा मिळाला आहे. बँकेचे व्हाईस चेअरमन चंद्रकांत कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेवराव मुंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी जाधव,सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक, सर्व शाखेचे कर्मचारी उत्तम कर्तव्य बजावत असून लवकरच ग्राहकांच्या सेवेत बँक मोबाईल बँकिंग, यूपिआय, फोन पे, गुगल पे सुरू करत असून बँकेने १०० कोटींची ऐतिहासिक वाटचाल केल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी दिली आहे.

### विजयकांत मुंडेंचे मार्गदर्शन आण् बँकेची उत्तुंग भरारी.!

**बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे यांनी केज शहारात २८ वर्षांपूर्वी कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली होती.बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने ग्राहकांचा विश्वास संपादीत करून स्वच्छ व पारदर्शक कारभार करत १०० कोटींचा ऐतिहासिक टप्पा पार केला आहे.तसेच बँकेला राज्य पातळीवर विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.**

# सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे मावलाई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील ब-हाणपुर येथील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळेच्या वतीने पत्रकारिता, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांना दरवर्षी मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

दि.०३ रोजी मावलाई देवी यात्रेनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. ढवळे यांनी जिल्ह्यातील विविध जनतेच्या प्रश्नांवर लोकशाही मार्गाने आंदोलने करत आवाज उठवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भागवत वराट यांनी सांगितले की, गेल्या १९



वर्षांपासून अध्यात्म, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मानित करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रमोद कुलकर्णी यांनी केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. गणेश ढवळे यांच्यासह शेतीनिष्ठ शेतकरी कल्याण कुलकर्णी, प्रमोद कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, विकास उमापुरकर, दिनेश लिंबेकर आणि सुशील कुलकर्णी यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास शेख युनुस, धनंजय बजगुडे, गणेश शेंडगे, कुमार देशमुख, संतोष कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मावलाई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर मातोश्री संस्थेच्या नवीन वर्षाचा शुभारंभ; वायबटवाडी हनुमान मंदिरात भाविकांना फळवाटप



**बीड । प्रतिनिधी**

मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड यांच्या नवीन वर्षाच्या कामकाजाची सुरुवात हनुमान जयंतीच्या पवित्र उत्सवाचे औचित्य साधून एका स्तुत्य सामाजिक उपक्रमाने करण्यात आली. या मंगल दिनानिमित्त वायबटवाडी येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना संस्थेच्या वतीने फळांचे वाटप करण्यात आले. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांना दिलासा मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या संपूर्ण फळवाटप कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन संस्थेच्या अध्यक्षा सौ. छाया दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी आणि समाजाची अशीच अविरत सेवा करत राहण्यासाठी बळ मिळावे, म्हणून बजरंगबलीच्या चरणी 'असाच आशीर्वाद सदैव पाठीशी राहू द्या', अशी भावपूर्ण प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे सचिव तेजस दिलीप पवार, रोहन डोळस, विनोद शिनगारे यांच्यासह संस्थेचा मित्रपरिवार आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वारकरी संप्रदायाचा वारसा जोपासणे ही काळाची गरज- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचा पाया भक्कम असून संतांच्या आशीर्वादाने आज गावोगावी नामस्मरण सुरू आहे. समाज एकत्र आणणे हाच यामागचा मुख्य उद्देश असून, संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर समाज घडवण्याचे काम वारकरी कुटुंब करत आहेत. आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड येथील राधाकृष्ण नगरी भागात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी नमूद केले की, शक्ती आणि भक्तीची सांगड घालून हनुमानाची आराधना आणि परमेश्वराचे नामस्मरण करणे ही आपली परंपरा आहे. राधाकृष्ण नगरी भागातील नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा देण्याचा आमचा




कायम प्रयत्न राहिला आहे. विकासाची ही आस आम्ही पूर्ण केली असून, येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या माध्यमातून धार्मिक कार्यालाही बळ मिळत आहे सध्याच्या काळात वाढत चाललेली 'भोंदूगिरी' आणि समाजाची होणारी दिशाभूल यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. जर आपण प्रभू श्रीराम आणि हनुमानाचा आदर्श सोडला, तर देव आणि भक्ताचे नाते टिकवणे कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. या कार्यक्रमाला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राधाकृष्ण नगर भागातील या उत्सवामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील भाविकांच्या उपस्थिती मध्ये हा सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

# पिंपरखेडात ओम श्री पूजा लिंग मल्लिनाथ देवस्थान यात्रा महोत्सव

### ●शिवलीला अमृत पारायण व शिव महापुराण कथा सोहळा

**वडवणी । प्रतिनिधी**

पिंपरखेड येथील ओम श्री पूजा लिंग मल्लिनाथ तीर्थक्षेत्रावर दिनांक ०५ एप्रिल ते ११ एप्रिल या कालावधीत भव्य दिव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली यांच्या वतीने ओम श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दर्शनाचा योग पिंपरखेड येथील भाविकांना मिळणार आहे. दिनांक पाच एप्रिलपासून शिवलीलामृत





व शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध कथा प्रवक्त्या श्री ह भ प शिव कथाकार मीराताई महाराज कुठे यांच्या वाणीतून कथा ऐकायला मिळणार आहे. तर दिनांक १० एप्रिल रोजी दत्त संस्थान कोल्हारवाडीचे दत्त उपासक श्रीहरी महाराज पवार यांचा सत्संग व दर्शन सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सिद्धेश्वर निपटे यांच्यासह सर्व भाविकांनी केले आहे. तालुक्यातील पिंपरखेड येथे ओम श्री पूजा लिंग मल्लिनाथ महाराज यांचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. सिद्धेश्वर निपटे यांच्या पुढाकारातून या ठिकाणी या तीर्थक्षेत्राची सेवा करण्यात येते. महान संत ओम श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या हस्ते या तीर्थक्षेत्राची स्थापना करण्यात आलेली आहे. जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली यांच्या वतीने या तीर्थक्षेत्रावर दिनांक पाच एप्रिल रोजी महान संत ओम श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक पाच एप्रिल रोजी पहाटे पाच वाजता श्री ओम श्री पूजा लिंग मल्लिनाथ अभिषेक व आरती होऊन दहा वाजता कलश पूजन व ग्रंथदिंडी मिरवणूक होणार आहे. अकरा वाजता ओम श्री हवा मल्लिनाथ महाराज यांचा तुलाभार होणार आहे. दररोज सकाळी नऊ ते दहा शिवलीलामृत पारायण कथा व दुपारी दोन ते पाच शिव महापुराण कथा प्रसिद्ध शिवकथाकार मीराताई महाराज कुठे यांची होणार आहे. या कथेत तबलावादन अविनाश महाराज शिंदे, गायन राजाभाऊ महाराज कुटे, बालासाहेब महाराज डोईजड करणार आहेत. ११ रोजी महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सिद्धेश्वर मुरलीधरराव निपटे यांच्यासह सर्व भाविकांनी केले आहे.

### देश वाचला तर...श्री हवा मल्लिनाथ महाराज यांचा उपदेश

**सर्व धर्म समभाव हा उद्देश समोर घेऊन मल्लिनाथ महाराज यांच्या वतीने जगभरात धर्मप्रसार केला जात आहे. देश वाचला तर सर्व जाती धर्म वृक्ष परिवार तुम्ही आम्ही वाचतो. देश वाचला नाही तर कोणीही वाचणार नाही. देशाचा विचार करा, जाती-धर्माचा विचार करू नका. कोणताच धर्म, कोणताच पक्ष मोठा नाही. देश सर्वात मोठा आहे. राष्ट्रधर्म सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे. हा बीज मंत्र कोणीही विसरू नका. देश द्वेष करू नका. देश वाचवायचा असेल तर देशाचे रक्षण करण्यासाठी सतत प्रयत्न करा. आपल्याला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक देशभक्तांनी बलिदान दिले आहे. सहजासहजी स्वातंत्र्य मिळाले नाही. आता आपल्याला स्वतंत्र टिकवून ठेवण्यासाठी त्याचे रक्षण करण्यासाठी बलिदानाची गरज नाही. योग्य व्यक्तीस मतदान देऊन संविधान व देश वाचवा, देशाचे रक्षण करा. परिवाराचे रक्षण करा. महान काम केलेल्या व्यक्तीला त्यांच्या जातीसाठी सिमित करू नये. त्यांना भारत देशाच्या उन्नतीसाठी वापरावे, जातीसाठी वापरू नये. ते सर्व देशासाठी अमूल्य रत्न आहेत. सर्वांनी जयंतीचे आचरण करावे, जातीपुरते करू नये. एकच जाती, एकच धर्माचे मूळ संविधान वाचवता येत नाही. संविधान व निसर्ग वाचवायचे असेल तर सर्व जाती धर्माची आवश्यकता आहे. आता सध्याच्या कालमानामध्ये देशाचा विचार केला तर देशभक्त होणे अत्यंत गरजेचे आहे.**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार दि. ०४ एप्रिल २०२६ •

## थोडक्यात...

### गेवराईचे पत्रकार शेख अन्सार यांची रिपब्लिकन पक्ष तय्यब नगर वार्ड अध्यक्षपदी नियुक्ती



तलवाडा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्या मध्य आणेक सामाजिक राजनीतिक संगठना व पक्ष कार्यरत असुन आणेक संगठना व पक्ष बहुतांश राजकारणाकडे अधिकचे लक्ष देतांना दिसुन येतात. परंतु विस टक्के राजकारण आणी अन्शी टक्के समाजकारण हे तत्वाधान समोर ठेऊन बहुजनांचे नेते रिपब्लिकन पक्ष प्रमुख संजय भैय्या सोनवणे यांच्या आदेशानुसार गेवराई येथील तय्यब नगर वार्ड अध्यक्षपदी गेवराईचे युवा पत्रकार रिक्षा युनियनचे अध्यक्ष शेख अन्सार यांची दिनांक ३/४/२०२६ / रोजी शुक्रवारी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पक्षप्रमुख बहुजनांचे नेते संजय भैय्या सोनवणे यांच्या आदेशानुसार व बीड जिल्हा अध्यक्ष विकास गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बहुजनांच्या व अल्पसंख्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारे गेवराई येथील युवक नेतृत्व शेख अन्सार यांची तय्यब नगर वार्ड अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली या निवडीचे पत्र गेवराई शहराचे प्रसिद्ध प्रमुख शेख खाजाभाई यांच्या हस्ते देऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या या कार्यक्रमास बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड व दैनिक संघर्ष योद्धाचे संपादक हुंबरे बापूसाहेब खाजाभाई शेख व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### महावितरणच्या विद्युत खांबाला करंट उतरल्याने बकरा चिटकून ठार



दिंद्रुड । प्रतिनिधी

लोखंडी विद्युत खांबाला करंट उतरल्याने शेळीपालन करणाऱ्या अत्यल्पभूधारक शेतकऱ्याचा बकरा चिटकून ठार झाल्याची घटना काल शनिवारी (दि.०४) सकाळी अकरा वाजता च्या सुमारास दिंद्रुड गावात घडली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ खांब काढण्याची प्रक्रिया पूर्ण केली. पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांनी मयत बकऱ्याचा पंचनामा केला. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील शेतकरी अशोक मारुती तांबे हे शेळीपालन करतात. शनिवारी सकाळी रोजच्या प्रमाणे शेळ्या चारण्यासाठी जात असताना येथील करंट उतरलेल्या एका लोखंडी खांबात बेण्याला राखलेला अंदाजे वीस हजार रुपये किंमतीचा बकरा चिटकुन जागीच ठार झाला. स्थानिकांनी विद्युत कार्यालयास माहिती दिल्यानंतर वीज पुरवठा तात्काळ बंद करत महावितरण व पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत बकरा मालकास महावितरण द्वारे भरपाई देण्याचे आश्वासन दिले.

### आदित्य शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्याची उत्तुंग भरारी ;एकाच वर्षात दोन पदांवर निवड

बीड । प्रतिनिधी




शिक्षण क्षेत्रात नामांकित असलेल्या आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी शाखेचा माजी विद्यार्थी अजय श्रीराम गिरी याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एकाच वर्षात दोन महत्त्वपूर्ण पदांवर निवड मिळवून शाखेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अजयची स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये (डइख) ज्युनिअर असोसिएट आणि कस्टमर सर्व्हिस असोसिएट या महत्वाच्या पदांसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी अभीनंदन केले. बँकिंग क्षेत्रातील नामांकित समजल्या जाणाऱ्या आयबीपीएस मार्फत ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षा घेण्यात आली होती. अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत अजयने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत यश संपादन केले. अजयने २०१७ ते २०२१ या कालावधीत आदित्य कृषी शाखेतून आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी योग्य मार्गदर्शनामुळे आज राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करत आहेत. अजयच्या या दुहेरी यशाबद्दल त्याचा व त्याच्या पालकांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य श्याम भुतडा, डॉ. डी. बी. सातपुते, प्रा. प्रिया गव्हाणे, डॉ. खेडकर, डॉ. ठोके, डॉ. मोरे यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्याचे कौतुक केले..

# भाजप कार्यकर्त्यांनी ‘पक्षाचे सेवक’ म्हणून काम करावे : राम कुलकर्णी

**बीडमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान उत्साहात ; डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आयोजन**




बीड । प्रतिनिधी

भाजप कार्यकर्त्याने स्वतःला कार्यकर्ता किंवा नेता न समजता पक्षाचा सेवक मानून समाजाच्या गरजेनुसार काम करावे. राष्ट्रभक्ती हा आपल्या कामाचा मूलाधार असून जनतेची सेवा करणे हेच अंतिम ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे राज्य प्रवक्ता तथा पत्रकार राम कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान २०२६ अंतर्गत बीड शहर मंडळाच्यावतीने आयोजित सौ.के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात प्रशिक्षण शिबिराची सांगता शुक्रवारी (दि.४) झाली. या शिबिराचे आयोजन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राम कुलकर्णी हे बोलत होते. व्यासपीठावर भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, माजी ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● भाजपचे राष्ट्रभक्ती, सामाजिक जागृतीसाठी कार्य : डॉ.क्षीरसागर

**समारोप सत्रात बीड नगरपरिषदेच्या भाजपच्या गटनेच्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी भारतीय जनता पार्टी हा विचारप्रधान पक्ष असून राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जागृतीसाठी कार्य करतो, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांनी शिस्त, समन्वय आणि समर्पण ठेवून काम करत सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. या शिबिराचे आयोजन करण्यासाठी डॉ.क्षीरसागर दाम्पत्याने पुढाकार घेतला.**

### ● योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवावी : शांतीनाथ डोरले

**सरकारच्या योजना व कामगिरी या विषयावर शांतिलाल डोरले यांनी मार्गदर्शन करताना प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला गॅस योजना, आयुष्यमान भारत योजनेसह विविध योजनांची माहिती दिली. या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी पार पाडावी, असे त्यांनी नमूद केले.**

### ● कार्यविस्तारासाठी सातत्य महत्त्वाचे : चंद्रकांत फड

**कार्य विस्तार कामाची दृष्टी या विषयावर सत्राध्यक्ष नवनाथ शिराळे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रकांत फड यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, कार्यविस्तार म्हणजे सातत्याने काम करणे होय. सत्तेत आल्यानंतर कामाचा वेग वाढवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा.**

### ● बुथ मजबूत तर पक्ष मजबूत : शिवाजी मुंडे

**बुथ व्यवस्थापन या विषयावर शिवाजी मुंडे यांनी मार्गदर्शन करताना बुथ सक्षम तर पक्ष सक्षम हा मंत्र दिला. बुथ प्रमुखांनी आपल्या क्षेत्रातील नागरिकांशी सतत संपर्क ठेवून शासनाच्या योजना समजावून सांगाव्यात, असे त्यांनी सांगितले.**

### ● ‘मन की बात’मधून समाजकार्याला प्रोत्साहन : सलीम जहांगीर

**मन की बात या विषयावर सलीम जहाँगीर यांनी मार्गदर्शन करताना पंतप्रधानांच्या संवादातून समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळते, असे सांगितले. कार्यकर्त्यांनी या माध्यमातून लोकांशी संवाद वाढवावा, असे त्यांनी नमूद केले.**

## बस स्थानक गळतीच्या घटनेची घेतली आ. संदीप क्षीरसागरांनी दखल

### ● प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला दिल्या सूचना

बीड । प्रतिनिधी

शहरात तब्बल १३ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या नव्या बसस्थानकाच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला असून अवकाळी पावसात बसस्थानक गळू लागल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले. यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. याची आ. संदीप क्षीरसागर यांनी दखल घेत, शुक्रवारी (दि.३) सकाळी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी प्रशासनाला तात्काळ दुरुस्ती करवून घेण्याच्या सूचना देत कंत्राटदाराचे कान टोचले आहेत.

दि. १ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसात बसस्थानकाच्या छतातून पाणी गळू लागल्याने प्रतीक्षालयात पाणी साचले. त्यामुळे प्रवाशांना उभे राहणे व बसणेही कठीण झाले होते. काही ठिकाणी छतामधून थेट पाण्याची धार लागली होती. कोट्यवधी रुपये खर्च करून



कामाचा दर्जा राखण्याबाबत काळजी घेतली नसल्याने ही घटना घडली आहे. पावसात चक्क छताला गळती लागल्याने नागरिकांना सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला होता. अशावेळी शॉर्टसर्किट होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. यावेळी विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरली होती. स्थानिक नागरिक व प्रवाशांकडून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही अशी निकृष्ट कामे होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. संबंधित ठेकेदार व विभागाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याची दखल घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी बसस्थानक परिसराची पाहणी करताना संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. प्रवाशांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी त्वरित उपाययोजना करा. कामाच्या दर्जात कुठेही तडजोड झाल्यास जबाबदारांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी पाणी निचरा व्यवस्था, छताची दुरुस्ती आणि स्वच्छतेबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच संबंधित विभागाने लवकरात लवकर आवश्यक दुरुस्ती करून प्रवाशांची गैरसोय दूर करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, एस.टी. महामंडळ विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## लिंबागणेश पाणीपुरवठा विहिरीच्या मोटारची वायर दीड महिन्यात 2 वेळा चोरी

**नेकनुर पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान ! पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल**

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात ग्रामपंचायतीमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर गेल्या दीड महिन्यात तब्बल दोन वेळा चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या योजनेवर



परिणाम होत असून पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या वारंवार होणाऱ्या चोरीमुळे ग्रामपंचायतीवर मोठा आर्थिक बोजा पडत असून आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सरपंच बालासाहेब जाधव यांनी दिली. यापूर्वी झालेल्या चोरीबाबत नेकनुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, पुन्हा चोरी ▶▶ उर्वरित पान २ वर

### स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमीचा ज्युनियर एआयएस उपक्रम गाजला : गौरंग काकडे राज्यात १० वा

बीड । प्रतिनिधी



विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमी तर्फे राबविण्यात आलेल्या ज्युनियर एआयएस उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात सहभागी झालेल्या गौरंग काकडे याने १७८/२०० गुण मिळवत राज्यस्तरावर १० वा क्रमांक, तसेच जिल्हास्तरावर १० वा क्रमांक मिळवून गोल्ड मेडल पटकावले आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशामुळे अकॅडमी व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सामान्यज्ञान, चालू घडामोडी, बुद्धिमत्ता चाचणी तसेच व्यक्तिमत्व विकास यांचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले. अकॅडमीचे संचालक यांनी सांगितले की, लहान वयातच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची दिशा देणे हा आमचा उद्देश.

## ढेकनमोह येथे क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात समारोप

**डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते बक्षीस वितरण**

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथे डॉ. सारिका योगेश क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट बॉल स्पर्धेचा समारोप मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेतील विजेत्या संघांना भाजप नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते ट्रॉफी व रोख बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या स्पर्धेत नाळवंडी सर्कलसह परिसरातील ग्रामीण भागातील अनेक संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. स्पर्धा अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडली. अंतिम फेरीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ढेकनमोह संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तर जरूड संघाने द्वितीय, अंतरवन पिंपरी संघाने तृतीय आणि मौजवाडी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस म्हणून ५१ हजार रुपये भाऊ नाना सुरवसे यांच्या वतीने देण्यात आले. द्वितीय बक्षीस ३१ हजार रुपये भगीरथ आबा बांडे यांनी, तृतीय बक्षीस २१ हजार रुपये अच्युत शेळके यांनी, तर चतुर्थ बक्षीस ११ हजार रुपये चंद्रकांत फड यांनी दिले. बक्षीस वितरण सोहळ्यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत ग्रामीण भागातील युवकांनी खेळाकडे अधिक लक्ष



देण्याचे आवाहन केले. तसेच अशा स्पर्धांमुळे गावोगावी क्रीडा संस्कृतीला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला उद्धव मेहेत्रे, भाऊ सुरवसे, भगीरथ बांडे, अच्युत शेळके, शांतिनाथ डोरले, चंद्रकांत फड, मा. सरपंच नागेश शिंदे, मिलिंद ठोकळ, रमेश वाघमारे, प्रा. नवनाथ मुसळे, वसंत गुंदेकर, राहुल कोरडे, डॉ. किशोर वरपे, शामराव राऊत, हरीष खाडे, अशोक वैद्य, प्रा. सुतार सर, पत्रकार अमोल जाधव, भागवत खाकरे, हनुमंत बाडे, अनंत करांडे, आण्णासाहेब डोके, अविनाश गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.